# शेतकरी कंपन्यांना खताची डीलरशिप

## सुमंता चौधरी : 'महाराष्ट्र अॅग्री-बिझनेस कॉनक्लेव'चे पुण्यात आयोजन

**पुणे (प्रतिनिधी) :** देशातील शेतकऱ्यांचे उत्पन्न वाढविण्यासाठी एफपीओ अर्थात शेतकरी उत्पादक कंपन्या सक्षम करण्यास केंद्र सरकारने सुरवात केली आहे. या कंपन्यांना खतविक्रीची डीलरशिप देण्याचादेखील निर्णय घेतला आहे, अशी माहिती केंद्र सरकारच्या लघुकृषक व्यापार (एसएफएससी) संघाचे व्यवस्थापकीय संचालक सुमंता चौधरी यांनी दिली.

शेतकरी उत्पादक कंपन्यांचे शेतबाजारातील व्यवहार व व्यवसाय वाढविण्यासाठी पुण्यातील 'यशदा'मध्ये आयोजित केलेल्या 'महाराष्ट्र अॅग्री-बिझनेस कॉनक्लेव'मध्ये ते बोलत होते. या वेळी कृषी आयुक्त सच्चिंद्र प्रताप सिंह, राष्ट्रीय ग्रामीण विकास संस्थेचे एनआयआरडीचे महासंचालक डॉ. डब्ल्यू. आर. रेड्डी, महाराष्ट्र स्पर्धाक्षम कृषी विकास प्रकल्पाचे व्यवस्थापकीय संचालक सुशील खोडवेकर, महाराष्ट्र राज्य पणन मंडळाचे कार्यकारी संचालक सुनील पवार, आत्माचे संचालक सुभाष खेमनार, बँक ऑफ बडोदाचे महाव्यवस्थापक बी. आर. पटेल, महाएफपीसीचे अध्यक्ष योगेश थोरात उपस्थित होते.

पान ४ वर ▸

### शेतकरी उत्पादक कंपन्यांसाठी आशादायक घडामोडी

- खताची डीलरशिप देण्यास केंद्रीय खत मंत्रालयाची मान्यता
- महाबीज देणार बियाणे विक्रीची डीलरशिप
- बडोदा बँकेकडून १२ कंपन्यांना तीन कोटींचे कर्ज मंजूर
- निर्यात प्रशिक्षणासाठी अपेडा-पणन मंडळाकडून प्रशिक्षण
- २० कंपन्यांना प्रत्येकी दहा लाखांचा भांडवली निधी
- राज्यातील १४०० कंपन्यांच्या बळकटीकरणासाठी प्रयत्न